महाराष्ट्र शासन
# कार्यालय नगर परिषद भंडारा
दूरध्वनी क्र-07184-255093
शहीद वार्ड, गांधी चौक,भंडारा
Email ID :bhandaranagarpalika@gmail.com
**(आपत्ती व्यवस्थापन कक्ष)**

जावक क्र- नपभ/मुअ/आ.व्य. क/2179 /2020 दिनांक- 06 / 08 /2020

// प्रेस नोट //

## भंडारा शहरात दिनांक ०८ व ०९ ऑगस्ट(शनिवार व रविवार) दोन दिवस 'जनता कर्फ्यु'

भंडारा शहरात कोव्हीड-१९ च्या रूग्ण संख्येत मागील काही दिवसात सातत्याने मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. यामुळे पुढील काळात नगर परिषद भंडारा क्षेत्रात कोरोना विषाणूचा सामूहिक प्रसार(Community spread) होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्या अनुषंगाने पुढील काळात कोरोना विषाणूचा प्रसार कशा प्रकारे रोखता येईल याअनुषंगाने आज दिनांक ०६/०८/२०२० रोजी मा. नगराध्यक्ष श्री सुनिल मेंढे यांचे अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीला भंडारा विधानसभा क्षेत्राचे आमदार श्री नरेंद्र भोडेकर, नगर परिषद उपाध्यक्ष श्री दिनेश भुरे, नगर परिषद स्थायी समिती सर्व सदस्य, नगर परिषदेतील सर्व पक्षाचे गटनेते व व्यापारी संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यामध्ये भंडारा शहरात मागील काही दिवसापासून सातत्याने वाढत असलेल्या कोरोना रूग्णाच्या संख्येबाबत आढावा घेण्यात आला सभेत मुख्याधिकारी श्री विनोद जाधव यांनी वाढती रूग्णसंख्या, शहरातील वाढते प्रतिबंधित क्षेत्र, शहरी भागातील सर्वे याबाबतची सविस्तर माहिती सभेत दिली. त्यानंतर सभेमध्ये येणा-या काळात कोरोना विषाणूचा समूह संसर्ग(Community spread) रोखण्यासाठी पुढील प्रमाणे कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले.

- कोरोना विषाणूचा समूह संसर्ग (Community spread) रोखण्यासाठी दिनांक ०८ व ०९ ऑगस्ट २०२० शनिवार व रविवार या दोन दिवशी संपूर्ण नगर परिषद भंडारा क्षेत्रात ४८ तासाचा जनता कर्फ्यु जनतेने उत्सुफुर्तपणे पालन करण्यात यावे असे सर्वानुमते ठरविण्यात आले.
- मा. अध्यक्ष तथा भंडारा-गोदिंता क्षेत्राचे खासदार श्री सुनिल मेंढे व भंडारा विधानसभा क्षेत्राचे आमदार श्री नरेंद्र भोडेकर यांनी सदर चा जनता कर्फ्यु शहरातील जनतेने स्वयफूर्तीने पालन करून यशस्वी करणेबाबत आवाहन केले.
- जनता कर्फ्यु मध्ये फक्त दवाखाने, मेडिकल दुकाने, दुग्ध व दुग्धजन्य पदार्थ व्यवसाय सुरू राहतील. सकाळी ९.०० वाजेपर्यत बाहेरील गावावरून येणारे दुग्धविक्रेते यांनी दुधाचे वितरण करावे.
- जनता कर्फ्यु हा कालावधी हा फक्त दोन दिवसाचा राहणार असून दिनांक १० ऑगस्ट २०२० पासून बाजारपेठा नियमानुसार विहित वेळेत सुरू राहतील.
- शहरातील मद्य विक्रीची दुकाने जनता कर्फ्युच्या कालावधीत बंद ठेवण्याबाबत मा. जिल्हाधिकारी, भंडारा यांना विनंती करण्यात यावी.

Scanned by CamScanner

- नियमित कालावधीत दररोज सायंकाळी ६.०० वाजेनंतर सर्वसाधारण दुकाने व सायंकाळी ७.०० वाजेनंतर अत्यावश्यक सेवेचे दुकाने सक्तीने बंद करणेबाबत पोलिस प्रशासन व नगर परिषद यांनी संयुक्त कार्यवाही करावी.
- कान्होबा व जन्माष्टामीचा सन शहरवासीयांनी अंत्यत साधेपणाने व घरगुती पध्दतीने साजरा करावा. व मुर्ती विसर्जन हे घरातच करण्यात यावे असे आवाहन करण्यात आले.

(श्री सुनिल मेंढे)
अध्यक्ष
नगर परिषद भंडारा

(विनोद जाधव)
मुख्याधिकारी तथा
इन्सीडंट कमांडर(कोव्हीड-19)
नगर परिषद भंडारा.

Scanned by CamScanner